# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.09.2025** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान आज गुजरात दौऱ्यावर, 'समुद्र से समृद्धी' उपक्रमाअंतर्गत विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घटान करणार
2. चलो जीते है या राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपटाचं देशभरात पुनःप्रसारण
3. H-1B visa प्रणालीसाठी अमेरिकेद्वारे नियमांमध्ये बदल
4. इराणमध्ये रोजगारासंदर्भात जाताना फसवणूक टाळण्याचं परराष्ट्र मंत्रालयाचं नागरिकांना आवाहन **आणि**
5. आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारत सुपर फोरमध्ये दाखल

**पंतप्रधान- गुजरात दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज गुजरातच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर आहेत. ते भावनगर इथं समुद्रक्षेत्राशी संबंधित 'समुद्र से समृद्धी' या कार्यक्रमात सहभागी होतील आणि 34 हजार 200 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील. यामध्ये सागरी प्रकल्प, एलएनजी पायाभूत सुविधा, अक्षय ऊर्जा, महामार्ग, आरोग्यसेवा आणि शहरी वाहतूक यासह अनेक क्षेत्रांचा समावेश आहे. मुंबईतील नवीन क्रूझ टर्मिनल, कोलकाता आणि पारादीप इथं बंदरांवर नवीन कंटेनर सुविधा आणि दीनदयाळ बंदरावर हरित जैव मिथेनॉल प्रकल्पांचा यात समावेश आहे.

**पंतप्रधान- किरियाकोस मित्सोताकिस**

पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी काल ग्रीसचे पंतप्रधान किरियाकोस मित्सोताकिस यांच्याबरोबर दूरध्वनीद्वारे चर्चा केली. भारत आणि ग्रीसदरम्यान द्विपक्षीय भागीदारी मजबूत करण्याच्या उद्देशाने विविध मुद्यांवर चर्चा झाली. यामध्ये व्यापार, गुंतवणूक, औद्योगिक विकास, संरक्षण, संपर्क आदी मुद्यांचा समावेश आहे. दरम्यान, पंतप्रधान मित्सोटाकिस यांनी 2026 मध्ये भारताने आयोजित केलेल्या कृत्रिम बुध्दीमत्ता शिखर परिषदेसाठी पाठिंबा दर्शविला.

**चलो जीते है**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवनप्रवासावर आधारित चलो जीते है या राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट देशभरातील लाखोशाळा आणि एकंदर पाचशे सिनेमाघरांमध्ये प्रदर्शित करण्यात आला. स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी प्रभावित झालेला छोटा नरु आपल्या लहान जगात बदल घडवून आणण्यासाठी संघर्ष करत असल्याची ही गोष्ट आहे. चलो जीते हैं हा चित्रपट मंगेश हडवळे यांनी दिग्दर्शित केला आहे. हा लघुपट 2018 मध्ये प्रदर्शित झाला होता. गेल्या 17 तारखेपासून 2 ऑक्टोबरपर्यंत पुन:प्रसारित करण्यात येत आहे.

**राष्ट्रपती- बिहार दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज बिहारच्या दौऱ्यावर आहेत. गयाजी इथं विष्णूपाद मंदिराला त्या भेट देणार आहेत. पूर्वजांना आदरांजला वाहण्यासाठी गयाजी इथं पित्रुपक्ष मेळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर या भागातील सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

**ईसी व्होट**

ऑनलाईन किंवा कुठल्याही सर्वसामान्य नागरिकाकडून मतदार यादीतून मतदारांची नावं परस्पर काढून टाकली जाऊ शकत नसल्याचा केंद्रीय निवडणूक आयोगानं पुनरुच्चार केला आहे. कर्नाटकातल्या आळंद मतदारसंघात कुठल्याही मतदाराची नावं चुकीच्या पद्धतीनं काढू टाकली गेलेली नसल्याचंही आयोगानं म्हटलं आहे. मतदारांची नावं संशयास्पदरीत्या काढून टाकण्याचा प्रयत्नांबद्दल खुद्द निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनीच 2023 मध्ये पोलिसांकडे एफआयआर नोंदवला होता, असा खुलासाही आयोगानं केला आहे. तसंच आयोगानं महाराष्ट्राच्या चंद्रपूर जिल्ह्यातल्या राजुरा मतदारसंघात मतदार यादीतली नावं काढून टाकल्याच्या आरोपाबाबतही खुलासा केला आहे. आयोगानं दिलेल्या माहितीनुसार राजुरामधील मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी सात हजार 792 नवमतदारांचे अर्ज प्राप्त झाले होते. या अर्जांच्या पडताळणीत सहा हजार 861 अर्ज अवैध ठरल्यानं ते फेटाळण्यात आले. एवढ्या मोठ्या संख्येनं अर्जांच्या संशयास्पद सत्यतेमुळे राजुराच्या निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांनी चौकशी करून एफआयआर नोंदवल्याचं आयोगानं म्हटलं आहे.

**टपाल**

दुबई इथं झालेल्या 28 व्या जागतिक टपाल परिषदेदरम्यान भारताची जागतिक टपाल संघटनेच्या प्रशासन परिषदेत पुन्हा निवड झाली आहे. भारताची पुनर्निवड आंतरराष्ट्रीय समुदायाचा इंडिया पोस्टच्या नेतृत्वावर, सुधारणांवर आणि नाविन्यपूर्ण डिजिटल उपक्रमांवर असलेला विश्वास दर्शवणारी असल्याचं. दळणवळण मंत्रालयाने एका निवेदनात म्हटलं आहे. भारत 1876 पासून जागतिक टपाल संघटनेचा सदस्य आहे आणि जागतिक पोस्टल नेटवर्क मजबूत करण्यासाठी सातत्याने योगदान देत आहे. भारत जागतिक टपाल क्षेत्राचे भविष्य घडवण्यात, नावीन्यपूर्ण, समावेशक आणि विकासाला चालना देण्यात सक्रिय भूमिका बजावत राहील. प्रशासकीय परिषदेत नेतृत्वाची भूमिका बजावण्याचा आपला हेतूही भारताने व्यक्त केला आहे.

**जीएसटी बैठक**

ट्रॅक्टर आणि शेतीसाठीच्या इतर साधनांवरच्या कमी केलेल्या जीएसटीचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे अशा सूचना केंद्रिय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी दिल्या. शेतीच्या अवजारांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधींसमवेत काल नवी दिल्लीत घेतलेल्या बैठकीत ते बोलत होते. दरकपातीचा फायदा मध्यस्थांच्या खिशात न जाता थेट शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे आणि याचा प्रभाव येत्या 22 तारखेपासूनच दिसायला हवा असं चौहान यांनी स्पष्टपणे सांगितलं

**इराण इशारा**

इराणमध्ये नोकरीची आश्वासनं किंवा तिथं नोकरी देऊ करण्याच्या प्रस्तावांबाबत सर्व भारतीय नागरिकांनी कटाक्षानं सतर्कता बाळगावी असा सावधगिरीचा सल्ला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं निवेदनाद्वारे दिला आहे. भारतीय नागरिकांना इराणमध्ये नोकरी देण्याची खोटी आमिषं दाखवून किंवा तिथून अन्य कुठल्या तरी देशात नोकरीसाठी पाठवलं जाईल अशी आश्वासनं देऊन भुलवलं जातं. इराणमध्ये पोहोचल्यावर त्यांचं गुन्हेगारी टोळ्यांकडून अपहरण केलं जातं आणि नंतर त्यांच्या सुटकेसाठी त्यांच्या कुटुंबाकडे खंडणी मागितली जाते. अशी बरीचं प्रकरणं अलीकडे घडल्याच्या पार्श्र्वभूमीवर अशा कोणत्याही आमिषांना बळी पडू नये असा सल्ला परराष्ट्र मंत्रालयानं दिला आहे.

**अमेरिका**

अमेरिकेत काम करण्यासाठी आवश्यक असलेल्या H-1B Visa प्रणालीसाठी आता 88 लाख रुपये शुल्क आकारलं जाणार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी यासंदर्भातील घोषणापत्रावर स्वाक्षरी केली. तंत्रज्ञान क्षेत्रातील परदेशी कामगारांचा अमेरिकेत येण्याचा ओघ कमी करण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आलं आहे. या व्हिसावर इतर देशांमधून कामगार आणण्यासाठी अर्ज करणाऱ्या कंपन्यांना दरवर्षी प्रति व्हिसा हे शुल्क भरावं लागेल आणि स्थानिक अमेरिकी नागरिकांपेक्षा हे परदेशी नागरिक अधिक कुशल असल्याचं सुनिश्चित करावं लागेल असं व्हाईट हाऊसचे कर्मचारीविषयक विभागाचे सेक्रेटरी विल शार्फ यांनी याबाबत बोलताना सांगितलं.

**भारत-पाक**

जगभरातील देशांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुध्दची कारवाईला बळकटी देण्याचं आणि कारवाई तीव्र करण्याचं आवाहन काल भारतानं केलं. पाकिस्तान, दहशतवाद आणि पाकिस्तान सैन्यदल यांच्यादरम्यान संगनमत असल्याबद्दल जगाला कल्पना आहे. पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनांद्वारे नव्यानं जारी केलेल्या व्हिडिओंसंदर्भात माध्यमांच्या प्रश्नाला उत्तर देताना, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल नवी दिल्ली येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, अशा घटनांमुळे परिस्थिती अधिक स्पष्ट होते.

**युएन**

संयुक्त राष्ट्रांच्या आगामी उच्चस्तरीय अधिवेशनादरम्यान पॅलेस्टिनी अध्यक्ष महमूद अब्बास यांना दुरस्थ माध्यमातून संबोधित करण्याची परवानगी देण्याचा संयुक्त राष्ट्राच्या आमसभेच्या ठरावाच्या बाजूने भारताने मतदान केलं. अमेरिकेने पॅलेस्टिनी अधिकाऱ्यांनाप्रत्यक्ष उपस्थित राहण्यापासून रोखण्यासाठी व्हिसा नाकारला आहे. या पार्श्वभूमीवर हा ठराव मंजूर करण्यात आला. 'पॅलेस्टिनी राज्याचा सहभाग' या शीर्षकाचा ठराव मंजूर करण्यासाठी 193 सदस्यीय महासभेने 145 मतांनी ठरावाच्या बाजूने, पाच सदस्यांनी विरोधात तर सहा जण गैरहजर होते. अमेरिका आणि इस्रायलने या निर्णयाविरुद्ध मतदान केले, तर भारत याला पाठिंबा देणाऱ्या देशांपैकी एक होता. या महिन्याच्या 23 तारखेपासून 80 व्या संयुक्त राष्ट्र महासभेचे आयोजन करण्यात आले आहे. अमेरिकेने पॅलेस्टिनी प्रतिनिधींना व्हिसा नाकारून आणि रद्द करून त्यांचा सहभाग रोखण्याच्या निर्णय घेतल्याबद्द या ठरावात खेद व्यक्त करण्यात आला आहे.

**क्रिकेट**

आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत काल अबुधाबी इथं झालेल्या अ गटातील अंतिम साखळी सामन्यात भारतीय संघानं ओमानचा 21 धावांनी पराभव केला. भारतानं ओमानपुढं विजयासाठी 20 षटकांत 189 धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. पण ओमानचा संघ 4 गड्यांच्या बदल्यात केवळ 167 धावा करू शकला. अर्शदीप सिंग 64 सामन्यांमध्ये 100 आंतरराष्ट्रीय टी-20 बळी घेणारा पहिला भारतीय गोलंदाज ठरला. या स्पर्धेत भारतानं यापूर्वी जिंकलेल्या दोन सामन्यांसाठी चार गुण मिळवून सुपर 4 मध्ये पोहोचला आहे. ओमानचा संघ स्पर्धेतून बाहेर गेला आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.